Vol II Issue XI May 2013

Impact Factor : 1. 2018 ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1. 2018**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 11, May. 2013
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# संगीत संशोधनातील सध्यस्थिती आणि उपाय

*शितल मोरे*

***सारांशः***

संगीताच्या क्षेत्रात ' संशोधन ' हा शब्द जरी अलीकडच्या काळात आला असे वाटत असले तरी भारतीय संगीतामध्ये शोधप्रक्रिया अगदी प्राचीन काळापासुन चालू आहे उदा. भरताचे नाटयशास्त्र ते पं. भातखंडे यांची थाटपध्दती किंवा ना. मो. खरे यांची रागांग वर्गीकरण पध्दती. परंतु येथे संशोधन याचा अर्थ काळानुसार असलेल्या पध्दतीमध्ये बदल करून ते प्रचारात आणणे असा होईल. म्हणजे येथे शोध लावणे असा संशोधनाचा अर्थ होईल.

***प्रस्तावना :–***

1.आजचा संशोधन हा शब्द अर्थात त्मेमंतबी म्हणजे असलेल्या तथ्यांचा पुर्नविचार करणे किंवा त्याचा चिकित्सक अभ्यास करणे त्यावर चिंतन मनन करणे असा होवू शकतो.
A)Research is composed of two words re & search, which means to search again or a careful investigation to re understand or reexamine the fact or to search them. 1)
B)अनुसंधान अथवा शोध उस प्रक्रिया या कार्य का नाम है, जिसमें बोधपुर्वक प्रयत्न से तथ्यों का संकलन कर सुक्ष्मग्राही एवं विवेचन बुध्दीसे उनका अवलोकन विश्लेषन करके नये तथ्यों या सिध्दांतोका उद्घाटन किया जाता है । अथ्रत पहले अज्ञात वस्तुओं, तथ्यों, या सिध्दांतो के अविष्कार की बोध पुर्वक कियाही अनुसंधान है । 2)
C)शोध के अंतर्गत हम सुनियोजीत ढंग से समस्योंका निर्धारण करते हुए निश्चित निष्कर्ष पर पहुंचते हुए सिध्दांतोका निर्माण करते हे । 3)

1.1 या सर्व व्याख्या बघता संगीतामध्ये संशोधन दोन प्रकारे होते
1.सोपधि शोध
2.निरोपाधीशोध 4)
1.सोपधि चा शाब्दीक अर्थ असे कार्य ज्यामुळे एक विशिष्ट पदवी, उपाधी प्राप्त होते म्हणजेच सोपधि मध्ये शोधार्थी वैज्ञानिक प्रक्रियेने निर्धारित लक्ष प्राप्त करतो.
2.निरोपाधी म्हणजे कोणत्याही पदवीचे लक्ष समोर न ठेवता समाजाच्या विकासासाठी, समाज उत्कर्षासाठी केलेले शोधकार्य या अंतर्गत येते. प्रस्तुत लेखामध्ये फक्त सोपाधी चा विचार केला आहे.

2)संगीत संशोधनाची सध्यस्थिती आणि उपाय :–
आज भारतामध्ये जवळजवळ सर्व विद्यापीठांमध्ये संगीतामध्ये संशोधन होत आहे. त्यामध्ये विविध स्तर आहेत. म्हणजे
1.एम.ए. अथवा एम.फिल स्तरावर
2.पीएच.डी स्तरावर
3.डी. लीट स्तरावर

2.1 एम.ए. अथवा एम.फिल स्तरावरील असलेल्या संशोधनाला लघु– शोधप्रबंध म्हणतात. आणि पीएच.डी आणि डी.लीट च्या प्रबंधाला शोधप्रबंध म्हटले जाते. यासाठी तसेच गुणांचे बंधन असते. एम.ए. स्तरावरील संशोधनास 6 महिने असतात. अर्थात विषय पण त्याप्रमाणे निवडावे लागतात. पी.एच.डी साठी किमान 3 वर्षाचा कालावधी अशी (नवीन नियमाप्रमाणे) यु.जी.सी. ने मान्यता दिली आहे.

2.2 विद्यापीठ स्तरावर एम.ए. स्तरावर लघुशोधप्रबंधीका किंवा संशोधन पध्दती यावर भर दिला गेला नसेल तर पुढे पीएच.डी साठी जेंव्हा विद्यार्थी प्रवेश घेतो तेंव्हा त्याला विषयाची निवड, रूपरेखा, संदर्भग्रंथ, सर्व प्रक्रियांचा अगदी प्राथमिक स्तरापासुन अभ्यास करावा लागतो. The writing of a thesis first of all requires a logical approach 5)

2.2.1 विषयाची निवड :

विषयाची निवड करण्यापुर्वी विद्यापीठात या आधी ज्या विषयांवर शोधप्रबंध लिहिले गेले आहेत त्याची यादी असली पाहिजे. आज इंटरनेट सारख्या सुविधा उपलब्ध आहेत त्यावर जशा इतर विषयांच्या सूची बघायला मिळतात त्याप्रमाणे संगीत विषयाची सूची किमान महाराष्ट्रात तरी माझ्या माहितीत नाहीत. जशी ' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यपीठ येथे विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल डॉ. वसंत विष्णु कुलकर्णी ' यांनी 1938 ते 2007 साल अखेर या 70 वर्षामध्ये स्वीकृत झालेले मराठीतील संपूर्ण प्रबंधाची सुची दिलेली आहे. 6)

**Title :** *संगीत संशोधनातील सध्यस्थिती आणि उपाय*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *शितल मोरे* **yr:2013 vol:2 iss:11**

या प्रकारचे काम संगीतामध्ये झाले तर जे विषय वारंवार होतात ते होणार नाही. त्यातुनच नवीन विषय मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही आणि अभ्यासकांना संदर्भासाठी मोठे भंडार खुले होईल.

विषय निवडीबाबत आणखी एक काळजी अभ्यासकाने घ्यायला पाहिजे ती म्हणजे विषयाची मर्यादा, संगीतामध्ये जे प्रबंध लिहिले जातात किंवा विषय निवडले जातात त्यामध्ये ही कमतरता खूप जाणवते. विषयाची मर्यादा अत्यंतिक जास्त असू नये. तसेच त्यामध्ये विषय इतका मर्यादित पण असू नये कि प्रबंधाची पाने वाढविण्यासाठी उगाच लिखाण करावे लागेल. विषय निवडताना हे तारतम्य बाळगायला हवे.

विषय निवडणे म्हणजे केवळ शिर्षकाचे शब्द निश्चित करणे नव्हे. ज्या क्षेत्रात थोडेफार वाचन झालेले आहे. एखाद्या विषयावर स्वतःला जाणवलेले काही नवीन विचार मनामध्ये निर्माण झाल्याखेरीज संशोधन प्रक्रिया सुरूच होवू शकत नाही. 7)

2.2.2 भाषा ज्ञान

संगीताचा शोधप्रबंध लिहिण्यासाठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असते. संगीताचा अभ्यास करताना भाषेचे ज्ञान कशाला ?हा प्रश्न नेहमी अभ्यासकांकडून येतो या बाबतीत डॉ. प्रेमलता शर्मा म्हणतात ' संगीत संबंधी यदी कुछ लक्षण गत अध्ययन करना है, प्रयोग का आधारभुत लक्षण जो है उनका यदी कोई अध्ययन करता है तो उसके लिए भाषाज्ञान आवश्यक है ।' 8)

संगीतामध्ये संशोधन करतांना संस्कृत भाषेचे ज्ञान असणे आवश्यक वाटते कारण आपण ज्या ग्रंथांना प्राथमिक स्त्रोत म्हणतो ते आधारभूत ग्रंथ अधिकाधिक संस्कृत मध्ये आहेत. आणि त्याचे भाशांतर अथवा कुणी दिलेला संदर्भ दुय्यम स्त्रोत आहेत. जर प्राथमिक स्त्रोत आपण प्रत्यक्ष हाताळला नाही तर संशोधनामध्ये त्याचे स्थान दुय्यम होते. जर आपला प्रबंध मध्यकालीन काळातील असेल तर फारसी भाषेचे थोडेफार ज्ञान असणे गरजेचे असते.

या सर्व भाषासमवेत ज्या भाषेमध्ये आपण प्रबंधाचे लिखाण करणार आहोत त्या भाषेवर आपले प्रभुत्व पाहिजे आणि एका शब्दाला अनेक समानार्थी शब्द माहित असणे गरजेचे असते.

2.2.3 संशोधनाचा उद्देश

संगीत या विषयामध्ये प्रथमतः समस्या खूप आहे कारण संगीताचे संस्थागत शिक्षण हे खूप जुने नाही. जेंव्हा विद्यापीठांमध्ये संगीत हा विषय शिकवायचा असे ठरले त्या वेळेस पुढे येणा–या समस्या आणि इतर विषयांच्या तूलनेत या विषयामध्ये मिळणा–या संधी याचा विचार झालाच नव्हता. त्यामुळे इतर विषयाप्रमाणे संगीत या विषयाला वर्गात शिकविणा–या विषय हाच दर्जा मिळाला. त्यानुसार विद्यापीठामध्ये हा विषय आहे म्हणून विद्यापीठांचे सर्व नियम या विषयाला जसेच्या तसे लागू झाले आहेत. या सर्व विद्यापीठाच्या नियमानुसार पीएच.डी. च्या पदवीधर शिक्षकांचे मुल्यमापन सुध्दा विद्यापीठाच्या नियमांप्रमाणेच होते. त्यामुळे संशोधनासंबंधी शिक्षकांमध्ये, एक नोकरीची गरज हा उद्देश सद्यस्थितीत जास्त प्रमाणात आढळून येतो.

2.2.4 गृहितक

कोणत्याही विषयाची रूपरेशा लिहिताना गुहितक (Hypothesis) हे फार महत्वाचे ठरते शोधनिबंध हा चिकित्सक विश्लेषणात्मक आणि नवनिर्माण करणारा असतो त्यासाठी संशोधकाला प्रारंभिक एखादा नवा विचार, एखादा अभ्युपगम (Hypothesis) असायला हवा. 9 एखादी समस्या जेंव्हा आपणास दिसते, समस्येपेक्षा एखाद्या गोष्टीविषयी जिज्ञासा वाटते त्याचवेळेला त्याचे तात्पुरता निष्कर्ष आपणास माहिती असावयास हवा.

गृहितक हि संशोधनाची प्राथमिक पायरी असते. गुहितकामुळे संशोधकाला दिशा मिळते. तसेच संशोधनाच्या विचार शक्तीला मार्गदर्शन मिळते. गुहितक हा संशोधनाचा आराखडाच असतो. रिना गौतम यांनी गृहितकाचे तीन स्त्रोत सांगितले आहेत.

1.Theory
2.Observation
3.Personal Experience 10

गृहितक हे संशोधनाच्या अंतिक टप्पावर बदलु शकते त्यामुळे संशोधकाला निश्कर्शा प्रति आणि गृहितक यातील तफावती बाबत निश्चिंत राहिले पाहिजे म्हणजेच प्रारंभिच्या समजांना किंवा गृहितकांना छेद देताना निष्कर्ष निघाला तरी संशोधकाला काळजी करण्याचे कारण नाही.

***संशोधन व ग्रंथालय :–***

संशोधनाच्या बाबतीत हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आज संगीतामध्ये संशोधन करायचे असल्यास विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून देणे अत्यंतिक महत्वाचे आहे. एम.ए. चा अभ्यास करताना कदाचित फक्त पाठयपुस्तकांसाठीच ग्रंथालयाचा उपयोग केला असेल परंतु पीएच.डी. साठी ग्रंथालयांची इतंभूत माहिती असणे गरजेचे आहे.

संगीताची पुस्तके ही सर्वच ग्रंथालयात मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील असे नाही. तर आपण संशोधन करताना कोणत्या ग्रंथालयांचा वापर करायचा हे आधी निश्चित केले पाहिजे. काही पुस्तके घरी आणावयास मिळत नाहीत त्या पुस्तकांतील टिप्पणांची ग्रंथालयातच नोंद करून घेणे, त्यासाठी एकच नोंद वही वापरणे इत्यादी बाबी महत्वाच्या आहेत.

***सामग्री संकलन :–***

संगीत विषयात या पैलूत सुधारणा करण्याची अत्यंतिक गरज वाटते. संगीताच्या संशोधनात सामग्री गोळा करण्याची अनेक संशोधकांना गरजच वाटत नाही. यामध्ये प्राथमिक सामग्री व द्वितीय सामग्री यातला फरक कळला पाहिजे. प्राथमिक सामग्रीत थेट ग्रंथच हाताळणे, तसेच संशोधकाने थेट कलाकारांना भेटूनच मुलाखती घेणे. इत्यादीचा सारख्या गोश्टींचा समावेश होतो.

मुलाखती घेण्याचे अनेक प्रकार आहेत.

1.व्यक्तीगत मुलाखत
2.समुहिक मुलाखत
3.औपचारिक मुलाखत

4.अनौपचारिक मुलाखत

मुलाखती घेतल्यावर त्याचा अभ्यास करणे आणि आपल्या विषयाशी संबंधीत मिळालेल्या सामग्रीचे मुल्यमापन करणे आवश्यक असते. यासाठी प्रश्नावलींचा उपयोग करता येवू शकतो. संगीत क्षेत्रात मुलाखतींमधुन भरपुर साधन सामग्री मिळू शकते. परंतु मुलाखतीचे व प्रश्नावलींचे सांख्यिक मुल्यमापन करून त्याचा निष्कर्ष काढणे आवश्यक असते.

घेतलेल्या मुलाखती केवळ प्रबंधात छापणे ही योग्य पध्दत नाही. प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाचा अभ्यास, दिलेल्या प्रश्नावलींची संख्या याचेही मुल्यमापन करणे गरजेचे असते.

प्रत्येक क्षेत्रात संशोधनाबद्दल आणखी जागरूकता निर्माण व्हायला पाहिजे. अर्थात त्यासाठी प्रत्येक विद्यापीठाच्या प्रत्येक विभागात अभ्यासकांसाठी खालील गोश्टींच्या पूर्तीची आवश्यकता आहे.

1.उच्चस्तर तसेच दुर्मीळ अशा संगीत संबंधी पुस्तकांची विपुलता विद्यापीठांच्या ग्रंथालयात आवश्यक आहेत.
2.संगीतात नवीन नवीन प्रयोग करण्यासाठी प्रयोगशाळा आवश्यक आहे.
3.विद्यापीठ स्तरावर कलाकार तसेच शास्त्रकारांच्या कार्यशाळा, चर्चासत्रे यांची आवश्यकता आहे.

अशा अनेक समस्या सद्यस्थितीमध्ये संगीत संशोधनामध्ये आढळून येतात. त्यामुळे संगीत क्षेत्रामध्ये खूप कमी प्रमाणात शोध होताना दिसून येतात. संगीत ही परंपरागत कला आहे. या परंपरेच्या सीमांमध्ये राहूनच काही नवीन शोध लावणे म्हणजेच ख–या अर्थाने संशोधन आहे. मनामध्ये कोणतीही संदिग्धता न ठेवता विचार व चिंतन करणे संशोधनास आवश्यक असते. या बाबतीत S.A.K. DURGA म्हणतात clear thinking & specificity are the basic requirements for researcher. 11

*संदर्भ सूची :–*

1.sources of Research in Indian Classical Music-Reena Goutam. Page 2 – Kanishka Publishers.
2.अनुसंधान प्रविधी सिध्दांत और प्रक्रिया – डॉ. एस.एन. गणेशा पान नं. 13 – लोकभारती प्रकाशन इलाहाबाद
3.भारतीय संगीत में लोक प्रविधी – डॉ. अलका नागपाल पान नं. 14 – राधा पब्लिकेशन
4.भारतीय संगीत में लोक प्रविधी – डॉ. अलका नागपाल पान नं. 19 – राधा पब्लिकेशन
5.प्रबंध लेखनाची पध्दती – डॉ. शकुंतला क्षिरसागर पान नं. 19 – युनिव्हर्सल प्रकाशन
6.A new approach to Indian Musicological methodology : & ethenomusicological Perspective – S.A.K. Durga. Page No. 47
7.शोध निबंधाची लेखनपध्दती – स.गं. मालशे – लोकवाड.मय गृह
8.भारतीय संगीत में अनुसंधान की समस्यांए और क्षेत्र– डॉ. सुभद्रा चौधरी पान नं. 20
9.शोधनिबंधाची लेखनपध्दती – स.गं.मालशे – लोकवाड.मय गृह
10.Sources of Research in Indian Classical Music – Reena Goutam Page No. 25 - Kanishka Publishers
11.A new approach to Indian Musicological methodology: & ethenomusicological Perspective – S.A.K. Durga.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net